# नवी मुंबई महानगरपालिका

## स्थायी समिती

स्थायी समितीच्या **दिनांक २७ डिसेंबर २०१२** रोजी भरलेल्या सभेतील **मंजूर /नामंजूर** इ. ठरावाची माहिती संक्षिप्त आणि मसूदा स्वरुपात खालील प्रमाणे आहे:-

**विषय क्र.०१**
**२७ डिसेंबर २०१२**

नवी मुंबई महानगरपालिकेच्या विविध विभागांकरीता पुढील दोन वर्षाकरीता छापील रजिस्टर्स, फॉर्मस् व पावती पुस्तके छपाई करुन घेण्याच्या कंत्राटाबाबत, आयुक्तांचे दि.१९/१२/२०१२ चे पत्र क्र.नमुंमपा/प्रशा/भांडार/४३१२/२०१२.

ठराव क्र.१७२.
**२७ डिसेंबर २०१२**

"उपरोक्त विषयासंदर्भात परिशिष्ठ-क मध्ये नमूद केलेल्या न्युतन दर निविदाधारकाकडून दोन वर्षाच्या कालावधीकरीता करण्यास व त्यासाठी होणा-या द्विवार्षिक खर्च रु.१,९९,०३,७०४/- इतक्या खर्चाने करार करण्यास सुचविल्याप्रमाणे, संमती देण्यात यावी."

**निर्णय:-** **संमत.**

**विषय क्र.०२**
**२७ डिसेंबर २०१२**

रुपये पाच लाखापेक्षा जास्त परंतु पंचवीस लाखापेक्षा कमी खर्चाच्या कामासंबंधी केलेल्या कराराबाबत, आयुक्तांचे दि.१७/१२/२०१२ चे पत्र क्र.नमुंमपा/अति./वि.मो./२५८०/२०१२.

**ठराव क्र.१७३.**
**निर्णय:-** **दफ्तरी दाखल.**

**विषय क्र.०३**
**२७ डिसेंबर २०१२**

कोपरखैरणे सेक्टर- १९ येथील (तीन टाकी जवळील) स्मशानभुमी विकसित करण्याच्या कंत्राटाबाबत, आयुक्तांचे दि.१८/१२/२०१२ चे पत्र क्र.नमुंमपा/श.अ./१४७१/२०१२.

ठराव क्र.१७४.
**२७ डिसेंबर २०१२**

"उपरोक्त विषयासंदर्भात मे.कैलाशचंद्र दिलीपकुमार कंन्स्ट्रक्शन प्रा.लि.या कंत्राटदाराबरोबर त्यांनी कार्यालयातील अंदाजपत्रकीय दरापेक्षा १६.०० टक्के जास्त दराने एकूण रु.१,२२,८५,८६९/- इतक्या खर्चाने करार करण्यास तसेच नियमानुसार भाववाढी पोटी देय असलेल्या खर्चास सुचविल्याप्रमाणे, संमती देण्यात यावी."

**निर्णय:-** **संमत.**